**ठळक बातम्या**

- राज्य घटनेच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत विशेष चर्चेला सुरुवात

- एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट महाराष्ट्र येत्या ४-५ वर्षात गाठेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्याकडून व्यक्त

- परभणी प्रकरणाची राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडून गंभीर दखल

- सुरुवातीच्या सत्रातल्या घसरणीनंतर देशातल्या शेअर बाजारात दिवसअखेर मोठी तेजी

**आणि**

- आंगणेवाडीची जत्रा यंदा २२ फेब्रुवारीला

**<><><><><>**

देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून  विशेष चर्चा सुरु झाली. भारतीय संविधानानं सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक असे  सर्व पैलू विचारात घेऊन राष्ट्रउभारणीसाठी मार्ग मोकळा करून दिला, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी या चर्चेला सुरुवात करताना सांगितलं. संविधान सभेनं तयार केलेलं संविधान हे केवळ अधिकृत दस्तऐवज नव्हे  तर ती  लोकांच्या इच्छेची अभिव्यक्ती होती, असं ते म्हणाले. संविधान ही काही एका पक्षाची देणगी नसून काही पक्ष त्याचं श्रेय स्वतःकडे घेऊ पाहत आहेत, अशी टीका त्यांनी यावेळी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार,  सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास

आणि सबका प्रयास या मूलमंत्रानुसार आणि संविधानात अभिप्रेत असलेल्या तत्त्वांनुसार  कार्य करत आहे. आपलं संविधान प्रगतीशील, सर्वसमावेशक आणि परिवर्तनशील आहे, गरीब कुटुंबात जन्म घेतलेली व्यक्ती देखील आज देशाच्या उच्च पदावर जाऊ शकते ही संविधानाची ताकद आहे, असं त्यांनी सांगितलं.

संविधान हे नागरिकांचं सुरक्षा कवच असून ते न्याय, ऐक्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं कवच आहे, असं काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी या चर्चेदरम्यान सांगितलं. सत्ताधारी या सुरक्षा कवचाला भेदण्याचं काम करत आहेत तसंच खाजगीकरणाच्या माध्यमातून सरकार आरक्षणाला कमकुवत करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

तर संविधान हा लोकशाहीचा आत्मा आहे, असं समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी सांगितलं. याशिवाय इतर पक्षाच्या खासदारांनीही या चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट महाराष्ट्र २०२८ ते २०३० पर्यंत पूर्ण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचा प्रारंभ करताना बोलत होते. गेल्या वर्षी राज्याच्या अर्थव्यवस्थेनं अर्ध्या ट्रिलियन डॉलरचे उद्दिष्ट पार केलं आहे, असं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्राला देशातलं सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकास धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल, असं ते म्हणाले. पाश्चिमात्य संस्कृतीत जो सक्षम आहे तोच विकास करू शकतो मात्र, आपल्या संस्कृतीमध्ये जन्मलेला प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे, असं फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी खासदार सुनेत्रा पवारही उपस्थित होत्या. यावेळी प्रधानमंत्र्यांनी महायुतीच्या ऐतिहासिक विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या आणि विविध विषयांवर चर्चा झाल्याची माहिती अजित पवार यांनी समाज माध्यमांवर दिली.

**<><><><><>**

परभणीतल्या हिंसाचार प्रकरणाची राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ तपशीलवार अहवाल आयोगाकडे तत्काळ सादर करण्याचे निर्देश आयोगानं परभणीचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षकांना दिले आहेत.

या प्रकरणी पोलिसांनी एकूण ८ गुन्ह्यांची नोंद केली असून, आतापर्यंत ५० जणांना अटक केली आहे. अटक केलेल्या व्यक्तीचा पोलीस कोठडी किंवा जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाल्याचं वृत्त खोटं आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि बाजारपेठा सुरळीत सुरू ठेवाव्या असं आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे.

याप्रकरणी निर्दोष व्यक्तींवर पोलीस प्रशासन करत असलेली कारवाई त्वरित थांबवावी आणि याप्रकरणी आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे त्वरित रद्द करावेत, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीनं केली आहे.

याप्रकरणी जालना, गडचिरोली जिल्ह्यात कोरची इथं निदर्शनं झाली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातल्या मसाजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी निषेध नोंदवण्यासाठी सकल मराठा समाजानं आज बीड जिल्हा बंदची हाक दिली होती. बीड शहरासह जिल्ह्यात इतरत्रही व्यापारी-दुकानदारांसह नागरिकांनी या बंदला प्रतिसाद दिला. या बंदच्या पार्श्वभूमीवर

पोलीस बंदोबस्त वाढवला असून राज्य राखीव पोलीस दलाच्या दोन कंपन्या तैनात केल्या आहेत.

या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात जयगड इथं झालेल्या वायुगळतीप्रकरणाची पूर्ण चौकशी करण्याकरता जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. समितीचा अहवाल हाती आल्यावर दोषींवर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती आमदार उदय सामंत यांनी दिली. त्यांनी आज रुग्णालयात दाखल विद्यार्थ्यांची भेट घेतली.

<><><><>

वेतनवाढी सह अन्य मागण्यांसाठी राज्यातील दीड लाख साखर कामगारांनी नियोजित संप दोन महिन्यांसाठी स्थगित केला आहे. या कामगारांनी सोमवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता. मात्र राज्य सरकारने वेतनवाढीसाठी त्रिपक्षीय समितीची स्थापना केली. त्यामुळं हा संप दोन महिन्यांसाठी स्थगित केल्याचं साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे यांनी सांगितलं. साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तीन घटकांच्या प्रतिनिधींची- त्रिपक्षीय समिती स्थापन केल्याचं काळे म्हणाले.

<><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज मोठे चढ - उतार दिसून आले. सकाळच्या सत्रात सुमारे बाराशे अंकांनी घसरुन सेन्सेक्स ८० हजारांच्या खाली जाणार अशी शक्यता निर्माण झाली होती. पण नंतर बाजारात तेजी सुरू झाली आणि दिवसअखेर सेन्सेक्स ८४३ अंकांनी वधारुन ८२ हजार १३३ अंकांवर बंद झाला. निफ्टी २२० अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ७६८ अंकांवर स्थिरावला. वर्षअखेर

आणि सुट्या यामुळं ग्राहकांकडून खरेदीचे प्रमाण वाढेल, अशी आशा आहे. त्यातच अमेेरिकेकडूनही माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा व्यवसाय मिळेल, अशी शक्यता निर्माण झाल्यानं बाजारात तेजी दिसून आली.

**<><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या आंगणेवाडीच्या भराडीदेवीची यात्रा २२ फेब्रुवारीला होणार आहे. २३ फेब्रुवारीला मोड यात्रेनं या यात्रेची सांगता होईल. दरम्यान धार्मिक विधीसाठी मंदिर उद्या १४ डिसेंबर पर्यंत बंद असल्याचं आंगणे कुटुंबीयांनी सांगितलं.

**<><><><>**

नागपूरच्या हिंगणा येथील जी.एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्मार्ट इंडिया हॅकॅथॉनच्या सातव्या अंतिम फेरीचा समारोप आज पार पडला.

या स्पर्धेतल्या ज्यूरी सदस्यांनी केलेल्या मूल्यांकनावर आधारित, कौशल्य विकास मंत्रालयानं दिलेल्या ४ समस्यांवर उपाय सुचवणाऱ्या संघांना विजेते घोषित केले. विजेत्या संघांत श्री साईराम अभियांत्रिकी महाविद्यालय चेन्नई, व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग बंगलोर, एक्रोपोलिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च इंदूर आणि वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आंध्र प्रदेश यांचा समावेश आहे.

**<><><><>**

बीडमधले शिक्षक साजेद अली यांच्या खून प्रकरणात विशेष मोक्का न्यायालयाने १२ जणांना जन्मठेप सुनावली आहे. उर्वरित दोघांपैकी एकाला  पाच वर्षांचा कारावास आणि पाच लाख रूपये दंडाची तर दुसऱ्याला सहा महिन्यांचा कारावास आणि पाचशे रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

**<><><><>**

माढा, दक्षिण सोलापूर आणि करमाळा या तालुक्यातील तीन सरपंचासंह १४ ग्रामपंचायत सदस्यांवर सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेची कारवाई केली. त्यांच्याविरोधात २०२१ ते २०२२ या दरम्यान शासकीय जागेवर अतिक्रमण, निवडणूक खर्च वेळेत सादर न करणे या आणि इतर कारणांसाठी जिल्हाप्रशासनाकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, किमान तापमानात किंचित वाढ झाली, तर विदर्भात काही ठिकाणी किंचित घट झाली. सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ८ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**